नगरसचिव

<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. २७**

**मार्च २०१८**

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २० मार्च २०१८ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात** (मनपा सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**'' नियुक्त्या ''**

**विषय क्र.१०४८**

जिल्हास्तरीय अल्पसंख्याक समितीवर ग्रामीण/नागरी क्षेत्रातील अल्पसंख्याक कल्याणाशी संबंधित असलेले प्रतिनिधी यांची नियुक्ती करून मिळणेबाबत मा. तहसिलदार सर्वसाधारण जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे सर्वसाधारण शाखा यांचे क्र. पसह/कावि/२८८८/२०१७, पुणे १, दि. २१/१२/२०१७ चे पत्र.

**( टिप – सदर विषयाचा विचार माहे मार्च २०१८ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१००१, दि.२०/२/२०१८ झाला आहे. )**

**विषय क्र.१०४९**

'' महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये तसेच मनपा सभा कामकाज नियमावलीतील नियम क्र. ६४ व ६८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे खालील चार विशेष समितीवर प्रत्येकी १३ मा.सभासदांच्या महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम ३१ (अ) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे मनपातील पक्षांच्या किंवा गटाच्या संख्या बळाच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देवून नियुक्त्या करणे.''

**१) विधी समिती २) शहर सुधारणा समिती ३) महिला बाल कल्याण समिती ४) क्रीडा समिती**

**( टिप – महिला बाल कल्याण समिती वरील एकूण सभासदांच्या ७५% सभासदत्व महिला सभासदांना द्यावयाचे आहे.)**

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**– स्थायी समितीचे ठराव –**

**विषय क्र.१०५०**

संदर्भ –
१) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग एक – अ मध्य उप विभाग, ऑक्टोबर ४,२०१७/ अश्विन १२, शके १९३९
२) मा. महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. मआ/टीजीओ/६८१, दि. २९/१२/२०१७ चे पत्र.
३) मा.सह महा.आयुक्त,करआकारणी व करसंकलन यांचे जा.क्र.टीजीओ/४०६२ दि.४/१/२०१८ दुरुस्तीचे पत्र
४) मा.स्थायी समिती ठराव क्र. १६५९,दि.४/१/२०१८

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायत मधील ११ नवीन गावांच्या मिळकतींच्या कर आकारणीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२९ अ मधील तरतूद विचारात घेऊन तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम परिशिष्ट ८ नियम ७ विचारात घेऊन लोहगाव (उर्वरित), मुढंवा (उर्वरित केशवनगर), हडपसर (संपूर्ण साडेसतरानळी),शिवणे (संपूर्ण उत्तम नगर),शिवणे, आंबेगाव खुर्द, उंड्री, धायरी, आंबेगाव बुद्रुक, फुरसुंगी, ऊरूळी देवाची या गावातील मिळकतीच्या करपात्र रक्कम निश्चित करण्यासाठी खालीलप्रमाणे मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१.लोहगाव (उर्वरित), मुढंवा (उर्वरित केशवनगर), हडपसर (संपूर्ण साडेसतरानळी),शिवणे (संपूर्ण उत्तम नगर),शिवणे, आंबेगाव खुर्द, उंड्री, धायरी, आंबेगाव बुद्रुक, फुरसुंगी, ऊरूळी देवाची या गावातील ज्या मिळकतींची नोंद आठ अ च्या रजिस्टरी आहे त्यांची वार्षिक करपात्र रक्कम निश्चित करणेसाठी मा.महा.आयुक्त यांच्या

विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या प्रस्तावातील अ. क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्या सालाचे घर त्या सालचा दर यानुसार (मा. महापालिका आयुक्त ठ.क्र. ६/४४९, दि. १२/०२/२००४ नुसार मान्यता) करआकारणी करून वार्षिक करपात्र रक्कम निश्चित करणेस. व सदर करपात्र रक्कमेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नियम १२९ अ (१) अन्वये २०१८-१९ हे प्रथम वर्ष विचारात घेऊन मिळकतीच्या करपात्र रकमेवर २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील मा. मुख्य सभेने केलेल्या मान्य केलेल्या दरानुसार सर्वसाधारण कर व इतर सेवाकर यांच्या एकत्रित बेरजेतून ग्रामपंचायत सर्वसाधारण कराची रक्कम वजा करून उर्वरित रकमेच्या २०%,४०%,६०%,८०% व सन २०२२-२३ मध्ये १००% वाढीसह कराची आकारणी करणेस तसेच पुढील कालावधीसाठी तात्कालीन म.न.पा. दराने कर आकारणी करणेस.

२. लोहगाव (उर्वरित), मुढंवा (उर्वरित केशवनगर), हडपसर (संपूर्ण साडेसतरानळी),शिवणे (संपूर्ण उत्तम नगर),शिवणे, आंबेगाव खुर्द, उंड्री, धायरी, आंबेगाव बुद्रुक, फुरसुंगी, ऊरूळी देवाची ग्रामपंचायतीमधील ८ अ रजिस्टरी या मिळकतीची करासंबंधी नोंद झालेली नाही,ज्यांची ग्रामपंचायती हद्दीत असताना कर आकारणी झालेली नाही अशा मिळकतीची कर आकारणी नजीकच्या भागात असलेल्या पुणे मनपा कडील मान्य वाजवी भाड्याच्या दराने पुणे महानगरपालिकेकडील प्रचलित पद्ध्तीनुसार कर आकारणी करणेस. तसेच निवासी मिळकतींचा वापर मालक स्वत:च्या राहण्यासाठी करीत असल्यामुळे व सदरची गावे पुणे म.न.पा. च्या हद्दीत समाविष्ट झाल्यामुळे त्यांनाही प्रचलित पद्धतीनुसार वाजवी भाड्यामध्ये ४०% व देखभाल दुरूस्तीकरीता १५%सवलत देऊन मिळकतीची करपात्र रक्कम निश्चित करणेस.

३. लोहगाव (उर्वरित), मुढंवा (उर्वरित केशवनगर), हडपसर (संपूर्ण साडेसतरानळी),शिवणे (संपूर्ण उत्तम नगर),शिवणे, आंबेगाव खुर्द, उंड्री, धायरी, आंबेगाव बुद्रुक, फुरसुंगी, ऊरूळी देवाची या गावात असलेल्या आयटी मिळकती, मोबाईल टॉवर्स, पोहण्याचे तलाव इ. स्वरूपाच्या मिळकतीची कर आकारणी पुणे म.न.पा कडे सध्या प्रचलित असलेल्या कार्यपद्धतीनुसार करणेस.

४.ज्या मिळकतीस ग्रामपंचायतीकडून बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळाला नसेल परंतु त्याचा वापर सुरू असेल व त्यांनी अद्याप ग्रामपंचायतीकडे कराची आकारणी करून घेतली नसेल अशा मिळकतीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६७ अ प्रमाणे व मनपा मध्ये सध्या असलेल्या धोरणानुसार कराची आकारणी करणेस. तसेच म.न.पा. अधिनियम १९४९ कलम १५० क प्रमाणेही मिळकतीचा वापर मागील सहा वर्षापूर्वीपासून चालू असल्याबाबत आवश्यक ते पुरावे विचारात घेवून मागील सहा वर्षापूर्वीच्या सदर गावातील नजिकच्या पुणे मनपाच्या हदीत असलेल्या गावातील मान्य दराने मिळकतेची कर आकारणी करणेस.

५.महाराष्ट्र मनपा सुधारणा अध्यादेश, २०१७ चा अध्यादेश क्र. ३ दिनांक ०८/०१/२०१७ अन्वये शासन निर्णय क्र. २०१५/प्रक्रं ३०५/नवि २० मंत्रालय मुंबई ४०० ०३२.दिनांक ११.१.२०१७ अन्वये मान्यता विचारात घेवून मा.स्थायी समिती ठराव क्र. ५६ दिनांक १८/०४/२०१७ व मा. मुख्य सभा ठराव क्र. ८० दिनांक २७/०६/२०१७ अन्वये निवासी अवैद्य बांधकाम असलेल्या मिळकतीचे चटई क्षेत्र ६०० चौ.फुट असल्याने पूर्वी केलेली तीनपट कर आकारणी दि.०१/०७/२०१७ पासून एकपट करणेबाबत, निवासी अवैद्य बांधकाम असलेल्या मिळकतीचे चटई क्षेत्र ६०१ ते १००० चौ फूट असल्याने पुर्वी केलेली तीनपट कर आकारणी दि. ०१.०७.२०१७ पासून दिडपट करणेबाबत, १००१ चौ.फुटापुढील निवासी बांधकाम प्रतीवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्यात यावी (सध्याचे दराने) मान्यता मिळाली आहे. त्याप्रमाणे नव्याने समाविष्ट लोहगाव (उर्वरित), मुढंवा (उर्वरित केशवनगर), हडपसर (संपूर्ण साडेसतरानळी),शिवणे (संपूर्ण उत्तम नगर),शिवणे, आंबेगाव खुर्द, उंड्री, धायरी, आंबेगाव बुद्रुक, फुरसुंगी, ऊरूळी देवाची ग्रामपंचायतिकडील मिळकतींची करआकारणी करणेस.

६. लोहगाव (उर्वरित), मुढंवा (उर्वरित केशवनगर), हडपसर (संपूर्ण साडेसतरानळी),शिवणे (संपूर्ण उत्तम नगर),शिवणे, आंबेगाव खुर्द, उंड्री, धायरी, आंबेगाव बुद्रुक, फुरसुंगी, ऊरूळी देवाची या गावातील सर्व आकारणी झालेल्या मिळकतीच्या डेटा, कागदपत्रे, रजिस्टर इ. पुणे महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या ताब्यात घेऊन पुढील प्रशासकीय कामाची पूर्तता सुरू करणेस.

७. लोहगाव (उर्वरित), मुढंवा (उर्वरित केशवनगर), हडपसर (संपूर्ण साडेसतरानळी),शिवणे (संपूर्ण उत्तम नगर),शिवणे, आंबेगाव खुर्द, उंड्री, धायरी, आंबेगाव बुद्रुक, फुरसुंगी, ऊरूळी देवाची या गावातील ज्या मिळकतीची नोंद आठ अ च्या रजिस्टरी आहे. व त्यांना ग्रामपंचायतीकडील दराने कर भरावयाचा आहे. अशांची कराची रक्कम भरून घेणेस तसेच याबाबत सर्व ग्रामपंचायतीकडील ८ अ चे रजिस्टरीवरील संगणकीय डेटा ऑनलाईन पुणे मनपा मध्ये समाविष्ट करून जरूर ती संगणकीय कार्यप्रणाली माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत तात्काळ कार्यवाही करणेस.

**( टिप – सदर विषयाचा विचार माहे मार्च २०१८ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१००४, दि.२१/२/२०१८ झाला आहे. )**

**विषय क्र.१०५१**

संदर्भ – १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था/१०४१ दि. १७/२/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२३०,दि.२७/२/२०१८

––––

पुणे महानगरपालिकेच्या श्री.दत्तात्रय विठ्ठल चव्हाण, बिगारी, कोथरुड क्षेत्रिय कार्यालय यांचेविरुध्द सक्षम न्यायालयात खटला दाखल करण्यास अभियोग पूर्व मंजूरी दिल्याची बाब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५९–अ नुसार मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

**विषय क्र.१०५२**

संदर्भ – १) मा.वसंत मोरे यांचे दि.२२/२/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२९८,दि.२७/२/२०१८

––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र. ४० ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, १.पाणीपुरवठा, पान क्र. २४, अ.क्र. १, शहरामध्ये पाण्याच्या नवीन लाईन विकसित करणे, (यादी क्र. एसपी २), पान क्र.४३, अ.क्र.६३१, प्रभाग ४० ड मध्ये अंजली नगर परिसरात जय मल्हार मंदिर परिसरात पाण्याची लाईन टाकणे. | २० लाख | ––– |
| नविन सुचविलेली कामे– | | |
| १.प्रभाग क्र.४० ड मध्ये सचाई माता मंदिर परिसरात विविध ठिकाणी पाण्याची लाईन टाकणे. | ––– | १० लाख |
| २.प्रभाग क्र.४० ड मध्ये आगम मंदिर परिसरात व विविध ठिकाणी पाण्याची लाईन टाकणे. | ––– | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.१०५३**

संदर्भ – १) मा.साईनाथ बाबर यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२९९,दि.२७/२/२०१८

––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र. २७ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १९.भाजी मंडया व पशुवधगृहे, पान क्र. ११२, अ.क्र. ८, शहरामध्ये भाजी मंडई बांधणे/भाजी मंडईमध्ये विकास कामे करणे (यादी एसजे २९), पान क्र.२५०, अ.क्र.१८, प्रभाग क्र. २७ ड मध्ये साईबाबानगर मध्ये अर्धवट असलेले भाजी मंडई काम पूर्ण करणे. | २० लाख | ––– |
| नविन सुचविलेली कामे– | | |
| १.प्रभाग क्र.२७ ड मध्ये साईनगर व शिवनेरीनगर मध्ये विविध विकासाची कामे करणे | ––– | १० लाख |
| २. प्रभाग क्र.२७ ड मध्ये साईनगर व कोंढवा परिसर मध्ये विविध विकासाची कामे करणे | ––– | १० लाख |

**विषय क्र.१०५४**

संदर्भ – १) मा.महेश वाबळे व मा.धनराज घोगरे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२३००,दि.२७/२/२०१८

––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र. ३५ ड मध्ये विविध विकासाची कामे करणेसाठी र.रु.१० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १७.खेळ, क्रीडांगणे, पान क्र. ११०, अ.क्र.८, शहरामध्ये क्रिडासंकुल, स्टेडियम उभारणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र. एसजे २४), पान क्र.२४६, अ.क्र.१४६, प्रभाग क्र. ३५ ड मध्ये आध्यापक ग्राऊंड येथे दुरुस्ती करणे. | १० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे- | | |
| प्रभाग क्र. ३५ ड मध्ये विविध विकासाची कामे करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.१०५५**

संदर्भ - १) मा.प्रमोद भानगिरे व मा.अविनाश बागवे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२३०१,दि.२७/२/२०१८

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

उप आयुक्त क्र.४ (जुना) अंतर्गत क्षेत्रिय कार्यालयामधील सन २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७ मधील पुर्ण झालेल्या कामांचे परंतू अखर्चित बिले खर्ची टाकणेसाठी र.रू. ३ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, अखर्चित असलेल्या तरतुदी | ३ कोटी | --- |
| नविन सुचविलेले काम- | | |
| उप आयुक्त क्र.४ (जुना) अंतर्गत क्षेत्रिय कार्यालयामधील सन २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७ मधील पुर्ण झालेल्या कामांचे परंतू अखर्चित बिले खर्ची टाकणे | --- | ३ कोटी |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.१०५६**

संदर्भ - १) मा.अविनाश बागवे, मा.प्रमोद भानगिरे व मा.दिलिप बराटे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२३०२,दि.२७/२/२०१८

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत पैलवान अभिजित कटके याने मानाचा महाराष्ट्र केसरी किताब पटकविला आहे. त्याच्या या गुणांचे कौतुक म्हणून पुणे महानगरपालिकेच्या वतीने रोख रक्कम देऊन व मानचिन्ह देऊन सत्कार करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१०५७**

संदर्भ - १) मा.प्रिया गदादे व मा.सौ.मंजुषा नागपूरे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२३०३,दि.२७/२/२०१८

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

प्रभाग क्र. ३० मधील वारकरी सेवा प्रतिष्ठाण संस्थेमार्फत सामाजिक कार्य केले जाते. सामाजिक कार्य करताना या संस्थेला जागेची नितांत गरज आहे. पुणे महानगरपालिकेच्या जनता सांस्कृतिक हॉल बांधलेला असून याठिकाणी विविध समाजोपयोगी कार्यक्रम चालविले जातात.

तरी सदरचा हॉल प्रभागातील वारकरी सेवा प्रतिष्ठाण या संस्थेबरोबर ३० वर्षे करारनामा करुन नाममात्र भाडयाने देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१०५८**

संदर्भ - १) मा.अविनाश बागवे व मा.प्रमोद भानगिरे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२३०४,दि.२७/२/२०१८

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

प्रभाग क्र.१९ मधील सावित्रीबाई फुले प्रशाला येथील विकसित मैदानावर मनपा शाळेतील विदयार्थ्यांकरिता मोफत फुटबॉल ॲकॅडमी हा संयुक्त प्रकल्प पुणे महानगरपालिका व लहुजी फुटबॉल क्लब यांच्या वतीने राबविण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**मा.शहर सुधारणा समितीचे ठराव**

विषय क्र.१०५९

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सा.प्र/८८५,दि.२२/१/२०१८ चे पत्र.
२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ५४८, दिनांक ९/२/२०१८

विषय– पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अधिक्षक अभियंता(विद्युत)वर्ग–१ या पदावरुन मुख्य अभियंता (विद्युत)वर्ग–१ या पदावर बढती देणेबाबत.

––––

मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्र अवलोकन केले तसेच त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व शिफारस विचारात घेऊन–

पुणे महानगरपालिकेतील अभियांत्रिकी संवर्गातील मुख्य अभियंता (विदयुत) वर्ग–१ (पे बॅन्ड ३७,४००–६७,०००+ ग्रेड पे रू.८,७००+ मान्य भत्ते+मोटार कार अलोऊन्स) या सवंर्गातील रिक्त पदावर बढतीने नेमणूक करणेसाठी शिफारस केलेल्या निवडयादीवरील सेवकाला दिलेला क्रम,मागासवर्गाचे आरक्षण/अनुशेष शासनाकडील वेळोवेळीचे आदेश, जागांची उपलब्धता इ.बाबी विचारात घेवून अधिक्षक अभियंता (विदयुत ) (वर्ग –१) या पदावरील कार्यरत अधिका–याला मुख्य अभियंता(विदयुत) (वर्ग –१) या पदावर बढतीने नेमणुक करण्यासाठी मा. खातेनिहाय बढती समिती सदस्यांनी खालीलप्रमाणे बढती पात्र सेवकाची एकमताने निवडयादीसाठी शिफारस केली आहे.

तरी मा. खातेनिहाय बढती समितीचा अहवाल स्विकृत होवून त्यावर स्वाक्षरी होणेस आणि निवडयादीसाठी शिफारस केलेल्या खालील उमेदवाराची बढतीने नेमणूक करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ (१) नुसार मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे .

| अ.क्र. | अधिका–याचे नाव | सध्याचा हुद्दा | बढतीचा हुद्दा | गट | बढतीसाठी जातीचा गट |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री कंदूल श्रीनिवास | अधिक्षक अभियंता (विदयुत ) | मुख्य अभियंता (विदयुत ) | खुला | खुला |

**( टिप – सदर विषयाचा विचार माहे मार्च २०१८ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१०५४, दि.२३/२/२०१८ झाला आहे. )**

विषय क्र.१०६०

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/९२३, दि.३०/१/२०१८ चे पत्र.
२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ५५२, दिनांक ९/२/२०१८

–––––

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना माहे जानेवारी २०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टि.डी. आर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर क्षेत्र चौ.मी | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे,हडपसर स.नं.१६०/३ब (पैकी) | प्लेग्राऊंड (पीजी–२ ) सन २००० चे सूक्ष्मदर्शी नकाशाप्रमाणे | श्रीमती पार्वतीबाई अर्जुन जांभुळकर | विरळ वस्ती | ९५०.०० चौ.मी | ४८८.३१चौ. मीX २.०० = ९७६.६२ चौ.मी | ००५२७६ | जानेवारी २०१८ |
| २ | पुणे,हडपसर स.नं.१६०/३ अ | प्लेग्राऊंड (पीजी–२ ) सन २००० चे सूक्ष्मदर्शी नकाशाप्रमाणे | श्रीमती पार्वतीबाई अर्जुन जांभुळकर | विरळ वस्ती | ९५०.०० चौ.मी | ४७७.८०चौ. मीX २.०० = ९५५.६ चौ.मी | ००५२७७ | जानेवारी २०१८ |

**विषय क्र.१०६१**

संदर्भ – १) मा.दिलीप वेडेपाटील व मा.महेश वाबळे यांचे दि. २९/०४/२०१७ चे पत्र
२) मा. किरण दगडे पाटील यांचे दि. १२/०५/२०१७ चे पत्र
३) शहर सुधारणा समिती ठ. क्र. ६० दि. १२.०५.२०१७ ला अनुसरून
४) पथ विभाग पुणे मनपा चे पत्र आ.क्र.खा/१७०५ दि.१९.६.२०१७
५) मा. आयुक्त यांचे जा. क्र. मआ/ शअ /झोन–६/९४७ दि. ३१.०१.२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
६) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ५५३, दिनांक १६/२/२०१८

-----

मा.महापालिका आयुक्त यांच्या पत्रासोबत जोडलेल्या नकाशानुसार (एबीसीडी)नुसार स.नं. ५२ ते ५८ कोथरूड येथील मौर्य विहार सोसायटी परिसर सहस्त्रबुद्धे गिरणी पासून ते कुमार परिसर या भागातील लोकांना मुख्य ३० मीटर डी. पी. रोडकडे जाण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये रस्ता आखण्यास मान्यता दयावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१०६२**

संदर्भ – १) मा. महेश वाबळे व मा. सौ.शितल सावंत यांचे दि. २८/०७/२०१७ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठ. क्र. १४४ दि. २८.०७.२०१७.
३) मा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/१०३५दि.१६.०२.२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
४) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.५६०, दिनांक २६/२/२०१८

-----

पुणे पेठ धनकवडी स,नं. १३, प्रभाग क्र. ३५ मधील जगताप क्रिडा संकुला जवळील पदमावती नगर सहकारी गृह रचना संस्था मर्यादित व संभाजीनगर येथील मिळकतील प्रवेश मार्ग उपलब्ध होण्यासाठी मा. महापालिका आयुक्त यांचे पत्रासोबत नकाशात दर्शविलेल्याप्रमाणे कलम २०५ अन्वये ९.०० मी. रूंदीचा रस्ता आखण्यात यावा अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१०६३**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/१०३७, दि.१६/०२/२०१८ चे पत्र.
२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.५६१, दिनांक २६/२/२०१८

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना माहे जानेवारी २०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर क्षेत्र चौ.मी | डी आर सी क्र. | डीआरसी दिल्याचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे, वडगाव बु।। स.नं.११/६+७ /१(पैकी)(जुना) स.नं.११/६अ/ १ (पैकी) (नवीन) | ३०मी. डी.पी. रस्ता | श्रीनिवास निळकंठ लोंढे व चंद्रशेखर हरी खरे | विरळ वस्ती | २७३.०० चौ.मी. | २७३.०० चौ.मी X २.२०= ६००.६० चौ.मी | ००५२३७ | जानेवारी २०१८ |

**विषय क्र.१०६४**

संदर्भ – १) डिफेन्स ईस्टेट ऑफिसर यांचे पत्र नं.१००२/REQN/CSNO/३७६/९९/।।।/४३, दि. १०/८/१५.
२) मा. विभागीय आयुक्त, पुणे यांचे एलअेक्यु/पीओ/१८/२०१२ दि. १/१/१२ चे आदेश.
३) विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१४ पुणे यांचे एलअेक्यु/११६/येरवडा/कलम ४८ (१)/५४९, दि. ७/११/१२.
४) महापालिका आयुक्त कार्यालय यांचे जा.क्र. मआ/शआ/३७६ दि. २०/०९/२०१७ चे पत्र.
५) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.५७३, दिनांक २६/२/२०१८

विषय – पुणे पेठ येरवडा स.नं.२५५,प्लॉ.नं.३०अे (जुना स.नं.१९अे+२+१९बी+३५/२, प्लॉ.नं.३०अे )

सि.स.नं. ३१४६+३८०२ येथील मिळकत डिफेन्स झोनमधून निवासी झोनमध्ये समाविष्ठ करणेबाबत.

----

मा. महापालिका आयुक्त यांनी यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

विषयांकित मिळकत डिफेन्स झोनमध्ये नसल्याने डिफेन्स विभागातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करण्यासाठी एम. आर. टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ३७(१) नुसार कार्यवाही करणेस व दै. वर्तमानपत्रात व राजपत्रात जाहिर प्रकटन देवून हरकती व सूचना मागविणेस आणि प्राप्त होणा–या हरकती / सुचनांवर शहर अभियंता यांचेकडे सुनावणी घेण्यास त्याबाबतचा अहवाल सादर करण्यास मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## मा.महिला व बाल कल्याण समितीचा ठराव

**विषय क्र.१०६५**

संदर्भ – १) मा.अजय खेडेकर आणि मा.योगेश समेळ यांचे दि.१६.१.२०१८ चे पत्र.
२) मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.१९४,दि.७/२/२०१८

----

महिला व बाल कल्याण समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिकेच्या माजी सभासदांना पुणे मनपा तर्फे अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेचा लाभ देण्यात येतो. अंशदायी सहाय्य योजने अंतर्गत माजी मा.सभासदांना व त्यांच्या पती / पत्नीला रूग्णालयामध्ये दाखल करावयाच्या वेळेस त्यांना सध्या १००% हमीपत्र जनरल वॉर्डचे देय आहे.

तरी यापुढे मा.सभासदांना सेमी प्रायव्हेट रूमची सोय अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजने अंतर्गत मिळावी व तसेच मा.सभासदांच्या मुलांना सुध्दा या योजने अंतर्गत समाविष्ट करून घेण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## नाव समितीचे निवेदन

**विषय क्र.१०६६**

पुणे मनपा हद्दीतील उद्याने,रस्ते, पूल, चौक इत्यादी सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावांची शिफारस करण्याबाबत झालेला मनपा ठराव क्र. ४, दि. २०/४/२०१७ ला अनुसरुन दि. १६/१२/२०१७ रोजी सकाळी ११=३० ( साडे अकरा ) वाजताचे नाव समितीचे निवेदनक्र.२ विचारासाठी.
(टिप – सदर विषयाचा विचार माहे मार्च २०१८ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.१००२, दि.२०/२/२०१८ चा झाला आहे.)

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र.१०६७**

संदर्भः– मा.विशाल तांबे, मा.सौ.अश्विनी भागवत व मा.किशोर उर्फ बाळाभाऊ धनकवडे यांची सूचना दि.९/१०/२०१७

----

पुणे हे विद्येचे माहेरघर अशा ठिकाणी समाजातील प्रत्येक घटकांसाठी एक शिक्षण संस्था असावी म्हणून राजश्री शाहू महाराज यांनी १ जून १९१८ साली श्री शिवाजी मराठा संस्थेची स्थापना केली. श्री शिवाजी मराठा संस्थेचे शताब्दी वर्ष १ जून २०१८ रोजी साजर होत आहे. श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या कार्यास १०० वर्ष पूर्ण होत आहेत. कोणत्याही संस्थेच्या आलेखात १०० वर्ष पूर्ण होणे ही अभिमानास्पद बाब आहे. ह्या संस्थेच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना शिक्षण घेऊन स्वबळावर समाजात उभे राहिले.

पुणे शहराच्या शैक्षणिक व समाजिक वाटचालीत श्री शिवाजी मराठा सोसायटीचे अमुल्य योगदान आहे. म्हणून पुणे महानगरपालिकेच्या वतीने देशाचे मा. कृषिमंत्री. श्री. शरदचंद्र पवार साहेबांच्या शुभहस्ते व मा.विनोद तावडे यांचे अध्यक्षतेखाली श्री शिवाजी मराठा सोसायटीचा खास मानपत्र देऊन सत्कार करण्यात यावा.

**विषय क्र.१०६८**

संदर्भः– मा. योगेश समेळ व मा. महेश लडकत यांची सूचना दि.२०/११/२०१७

----

पुणे महानगरपालिकेतर्फे पुणे शहरातील नागरिकांसाठी कमला नेहरू रूग्णालयामध्ये ह्दयविकार व संबंधित विविध तपासण्या तसेच ह्दय शस्त्रक्रिया विभाग यांचा लोकार्पण समारंभ गुरूवार दि. ३० नोव्हेंबर २०१७ रोजी सकाळी ११.०० ( अकरा ) वाजता मा.ना.गिरीष बापट, पालकमंत्री, पुणे जिल्हा तथा मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन,संसदीय कार्य, यांचे शुभहस्ते व मा.ना.प्रकाश जावडेकर, केंद्रीय मंत्री,पर्यावरण व वने संसदीय कामकाज, मा.ना. दिलीप कांबळे, राज्यमंत्री, सामाजिक न्याय व अनु.जाती–जमाती व

विशेषसहाय्य, मा.ना.विजय शिवतारे, राज्यमंत्री, जलसंपदा व जलसंधारण,मा.ना.विशाल चोरडिया,सभापती,महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मुंबई यांचे विशेष उपस्थितीत तसेच मा. अनिल शिरोळे, खासदार, मा.सौ.सुप्रिया सुळे,खासदार, मा. शिवाजीराव आढळराव पाटील, खासदार, मा. ॲड्. सौ. वंदना चव्हाण, खासदार, मा. संजय काकडे, खासदार, मा. अनु आगा, खासदार, मा.माधुरी मिसाळ, आमदार, मा.भीमराव तापकीर, आमदार, मा. विजय काळे, आमदार, मा.सौ.मेधा कुलकर्णी, आमदार, मा. योगेश टिळेकर, आमदार,मा. जगदीश मुळीक, आमदार, मा. डॉ. निलम गोऱ्हे, आमदार, मा. अनिल शिवाजीराव भोसले, आमदार, मा. ॲड्. जयदेव गायकवाड, आमदार, मा. शरद रणपिसे, आमदार, मा. अनंतराव गाडगीळ, आमदार,तसेच मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर, मा.मुरलीधर मोहोळ, अध्यक्ष, स्थायी समिती, मा.श्रीनाथ भिमाले, सभागृह नेता, मा.चेतन तुपे, विरोधी पक्षनेते, मा.अरविंद शिंदे, पक्षनेते, काँग्रेस, मा.संजय भोसले, पक्षनेते, शिवसेना, मा.वसंत मोरे, पक्षनेते, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, मा.सौ.अश्विनी लांडगे, पक्षनेत्या,ए.आय.एम.आय.एम., मा.सौ.सुनिता वाडेकर, पक्षनेत्या,आर.पी.आय., मा.महेश लडकत, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती ,मा.सौ.राणी रायबा भोसले ,अध्यक्षा, महिला व बाल कल्याण समिती, मा.ॲड्.गायत्री रत्नदिप खडके ,अध्यक्ष,विधी समिती, मा.सम्राट थोरात, अध्यक्ष, क्रीडा समिती, मा.बापुराव कर्णे ( गुरूजी ), अध्यक्ष,नाव समिती, मा.राजेश येनपुरे, अध्यक्ष, कसबा–विश्रामबागवाडा प्रभाग समिती, मा.सौ.पल्लवी जावळे, स्थानिक नगरसेविका , मा.रविंद्र धंगेकर, स्थानिक नगरसेवक, मा.सौ.सुजाता शेट्टी, स्थानिक नगरसेविका, मा.योगेश समेळ, स्थानिक नगरसेवक इत्यादी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात आला, त्यास पश्चात मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्र.१०६९**

संदर्भः– मा. आदित्य माळवे व मा.सौ.सोनाली लांडगे यांची सूचना दि.२७/११/२०१७

––––

पुणे महानगरपालिकेतर्फे शिवाजीनगर–घोले रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन समारंभ शुक्रवार दि. २६ जानेवारी २०१८ रोजी सकाळी १०.०५ ( दहा वाजून पाच मिनिटे ) वाजता मा.ना.गिरीष बापट, पालकमंत्री, पुणे जिल्हा तथा मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन,संसदीय कार्य, यांचे शुभहस्ते व मा. विजय काळे, आमदार, यांचे प्रमुख उपस्थितीत तसेच मा.ना.प्रकाश जावडेकर, केंद्रीय मंत्री,पर्यावरण व वने संसदीय कामकाज, मा.ना. दिलीप कांबळे, राज्यमंत्री, सामाजिक न्याय व अनु.जाती–जमाती व विशेषसहाय्य, मा.ना.विजय शिवतारे, राज्यमंत्री, जलसंपदा व जलसंधारण,मा.ना.विशाल चोरडिया,सभापती,महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मुंबई यांचे विशेष उपस्थितीत तसेच मा. अनिल शिरोळे, खासदार, मा.सौ.सुप्रिया सुळे,खासदार, मा. शिवाजीराव आढळराव पाटील, खासदार, मा. ॲड्. सौ. वंदना चव्हाण, खासदार, मा. संजय काकडे, खासदार, मा. अनु आगा, खासदार, मा.माधुरी मिसाळ, आमदार, मा.भीमराव तापकीर, आमदार, मा.सौ.मेधा कुलकर्णी, आमदार, मा. योगेश टिळेकर, आमदार,मा. जगदीश मुळीक, आमदार, मा. डॉ. निलम गोऱ्हे, आमदार, मा. अनिल शिवाजीराव भोसले, आमदार, मा. ॲड्. जयदेव गायकवाड, आमदार, मा. शरद रणपिसे, आमदार, मा. अनंतराव गाडगीळ, आमदार,तसेच मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर, मा.मुरलीधर मोहोळ, अध्यक्ष, स्थायी समिती, मा.श्रीनाथ भिमाले, सभागृह नेता, मा.चेतन तुपे, विरोधी पक्षनेते, मा.अरविंद शिंदे, पक्षनेते, काँग्रेस, मा.संजय भोसले, पक्षनेते, शिवसेना, मा.वसंत मोरे, पक्षनेते, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, मा.सौ.अश्विनी लांडगे, पक्षनेत्या,ए.आय.एम.आय.एम., मा.सौ.सुनिता वाडेकर, पक्षनेत्या,आर.पी.आय., मा.महेश लडकत, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती ,मा.सौ.राणी रायबा भोसले ,अध्यक्षा, महिला व बाल कल्याण समिती, मा.ॲड्.गायत्री रत्नदिप खडके ,अध्यक्ष,विधी समिती, मा.सम्राट थोरात, अध्यक्ष, क्रीडा समिती, मा.बापुराव कर्णे ( गुरूजी ), अध्यक्ष,नाव समिती, मा.आदित्य माळवे, अध्यक्ष, शिवाजीनगर–घोले रोड प्रभाग समिती, मा.सौ.स्वाती लोखंडे, स्थानिक नगरसेविका, मा.सौ.निलिमा दत्तात्रय खाडे, स्थानिक नगरसेविका, मा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे, स्थानिक नगरसेविका, मा.सिध्दार्थ शिरोळे, स्थानिक नगरसेवक इत्यादी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात आला, त्यास पश्चात मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्र.१०७०**

संदर्भः– मा. आबा बागुल यांची सूचना दि.५/१२/२०१७

––––

प्रभाग क्र. ३५ ब मधील पुणे महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या ग्रे वॉटर प्रकल्पाचे उद्घाटन भारतीय राष्ट्रीय काँग्रेस प्रदेशाध्यक्ष मा. अशोकराव चव्हाण साहेब, माजी मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते व मा. गिरीशजी बापट, पालक मंत्री, पुणे जिल्हा यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात यावे. तसेच या कार्यक्रमास स्थानिक आमदार, खासदार, लोकप्रतिनिधी व पुणे महानगरपालिकेचे पदाधिकारी यांना निमंत्रीत करण्यात यावे.

सदर कार्यक्रमाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावेत.

**विषय क्र.१०७१**

संदर्भः- मा. सौ. वैशाली बनकर, मा. योगेश ससाणे, मा. मारूती तुपे, मा. सौ.उज्वला जंगले यांची सूचना दि.१४/१२/२०१७

----

भारत फोर्ज कंपनीच्या सी.एस.आर च्या माध्यमातून बंटर स्कूल, शाळा नं. ८७ व साध्वी सावित्रीबाई फुले विद्यानिकेतन, हडपसर, पुणे येथील शाळेमध्ये बांधलेल्या नविन टॉयलेटचे व शाळा नं. ८७ मध्ये पुणे महानगरपालिकेमार्फत बांधलेल्या हॉलचे उद्घाटन मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे शुभहस्ते व डॉ. बाबासाहेब कल्याणी, मॅनेजिंग डायरेक्टर, भारत फोर्ज कंपनी, सौ. लिना देशपांडे, सी.एस.आर. प्रमख माजी नगरसेवक सुनिल बनकर यांचे प्रमुख उपस्थितीत करण्यात यावा.

सदर कार्यक्रमाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावेत.

**विषय क्र.१०७२**

संदर्भः- मा.संजय भोसले, मा.अविनाश साळवे, मा.श्वेता चव्हाण व मा.बाळा ओसवाल यांची सूचना दि.२१/१२/२०१७

----

पुणे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक श्री. दीपक गावडे यांचा मुलगा शिवराज गावडे याला भारतीय सैन्य दलात लेफ्टनंट पदावर काम करण्याचा मान मिळाला आहे. तरी शिवराज गावडे यांचा पुणे महानगरपालिकेतर्फे खास सत्कार करण्यात यावा.

**विषय क्र.१०७३**

संदर्भः- १) मा.सुशिल मेंगडे , मा.राजेश बराटे , मा.सौ.वृषाली चौधरी व मा.सौ.लक्ष्मी दुधाने यांची सूचना दि.५/२/२०१८

----

पुणे महानगरपालिकेतर्फे प्रभाग क्र.३१ मधील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था मुख्य चौक येथील उड्डाणपुलाचा उद्घाटन समारंभ शनिवार दि. १७ फेब्रुवारी २०१८ रोजी सकाळी ११.०० (अकरा) वाजता मा.ना.गिरीष बापट, पालकमंत्री, पुणे जिल्हा तथा मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन,संसदीय कार्य, यांचे शुभहस्ते व मा.ना.प्रकाश जावडेकर, केंद्रीय मंत्री,पर्यावरण व वने संसदीय कामकाज, मा.ना. दिलीप कांबळे, राज्यमंत्री, सामाजिक न्याय व अनु.जाती-जमाती व विशेषसहाय्य, मा.ना.विजय शिवतारे, राज्यमंत्री, जलसंपदा व जलसंधारण,मा.ना.विशाल चोरडिया,सभापती,महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मुंबई यांचे विशेष उपस्थितीत तसेच मा.श्री.शरदचंद्रजी पवार, खासदार तथा अध्यक्ष,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, मा.डॉ.विश्वजीत कदम, अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस, मा.श्री.उध्दवजी ठाकरे, शिवसेना पक्षप्रमुख, मा.श्री.राज ठाकरे, संस्थापक व अध्यक्ष महाराष्ट्र नवनिर्माण सेना, मा.श्री.योगेश गोगावले, शहराध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, पुणे यांचे प्रमुख उपस्थितीत तसेच मा. अनिल शिरोळे, खासदार, मा.सौ.सुप्रिया सुळे,खासदार, मा. शिवाजीराव आढळराव पाटील, खासदार, मा. ॲड्. सौ. वंदना चव्हाण, खासदार, मा. संजय काकडे, खासदार, मा. अनु आगा, खासदार, मा.सौ.मेधा कुलकर्णी, आमदार,मा.माधुरी मिसाळ, आमदार, मा.भीमराव तापकीर, आमदार, मा. विजय काळे, आमदार, मा. योगेश टिळेकर, आमदार,मा. जगदीश मुळीक, आमदार, मा. डॉ. निलम गोऱ्हे, आमदार, मा. अनिल शिवाजीराव भोसले, आमदार, मा. ॲड्. जयदेव गायकवाड, आमदार, मा. शरद रणपिसे, आमदार, मा. अनंतराव गाडगीळ, आमदार,तसेच मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर, मा.मुरलीधर मोहोळ, अध्यक्ष, स्थायी समिती, मा.श्रीनाथ भिमाले, सभागृह नेता, मा.चेतन तुपे, विरोधी पक्षनेते, मा.अरविंद शिंदे, पक्षनेते, काँग्रेस, मा.संजय भोसले, पक्षनेते, शिवसेना, मा.वसंत मोरे, पक्षनेते, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, मा.सौ.अश्विनी लांडगे, पक्षनेत्या,ए.आय.एम.आय.एम., मा.सौ.सुनिता वाडेकर, पक्षनेत्या,आर.पी.आय., मा.महेश लडकत, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती ,मा.सौ.राणी रायबा भोसले ,अध्यक्षा, महिला व बाल कल्याण समिती, मा.ॲड्.गायत्री रत्नदिप खडके ,अध्यक्ष,विधी समिती, मा.सम्राट थोरात, अध्यक्ष, क्रीडा समिती, मा.बापुराव कर्णे ( गुरूजी ), अध्यक्ष,नाव समिती, मा.सुशिल मेंगडे, अध्यक्ष, वारजे-कर्वेनगर प्रभाग समिती व स्थानिक नगरसेवक, मा.सौ.लक्ष्मी दुधाने,स्थानिक नगरसेविका, मा.सौ.वृषाली चौधरी, स्थानिक नगरसेविका, मा.राजेश बराटे, स्थानिक नगरसेवक, मा.शिवराम मेंगडे, माजी नगरसेवक इत्यादी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात आला, त्यास पश्चात मान्यता देण्यात येत आहे.

**( टिप - विषय क्र.१०६७ ते १०७३ हे दि.७/२/२०१८ रोजी मा.पक्षनेते सभेत फेरफारासह मान्य झालेले आहेत.)**

<u>विषय क्र.१०७४</u>

संदर्भः- मा.सौ.स्वाती लोखंडे व मा.सिध्दार्थ शिरोळे यांची सूचना दि.२३/२/२०१८

----

मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांनी संगमवाडी येथील सिटी सर्व्हे नंबर ५१,५२ व ५४ या ठिकाणी असलेली मोकळी जागा क्रांतीवीर लहूजी वस्ताद साळवे यांचे राष्ट्रीय स्मारक बांधण्यासाठी आरक्षित केली असल्याने मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :-९/३/२०१८

**सुनील पारखी**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**